# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १७/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती विशेष सभा शुक्रवार दिनांक १७/०६/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०६ दि. १६/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ६) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| ९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**गैरहरज असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जकात अभिकर्त्याबाबत ठेका आला होता. बजेट दरम्यान जकातीमध्ये स्थायी समितीने वाढ सुचविली होती व त्या वाढीवर चर्चाही झाली आणि ह्या ठेकेदाराने वीस कोटीची वाढ ह्या ठेकेदाराने निविदेमध्ये सुचविली आहे आणि हे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. याबाबत काही ठेकेदार न्यायालयात गेले होते आणि न्यायालयाने जो निर्णय घेतला आहे, त्या निर्णयाला अनुसरुन प्रकरण ८ कलम ३५ प्रमाणे ही सभा बोलवण्याबाबत सुचना आयुक्त साहेबांनी केली. त्यांच्या सुचनेवरुन आजची ही सभा चोवीस तासाच्या आतमध्ये बोलवली आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा विषय आहे आणि ही वीस कोटीची वाढ मिरा भाईंदर महानगरपालिकेला मिळालेली आहे व विकास कामे करण्याकरिता आपल्याला गती मिळणार आहे. याकरिता योग्य ते सहकार्य सर्व सन्मा. सदस्य करतील अशी मी अपेक्षा बाळगतो आणि सर्व सन्मा. सदस्यांचे बजेटच्या कामामध्ये स्थायी समिती सदस्य म्हणून आपली महत्वाची भुमिका असते. सर्व सन्मा. सदस्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो, प्रशासनाचेही धन्यवाद मानतो आणि सचिवांना आजची सभा सुरु करण्याकरिता निर्देश देत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, हा विषय एकदम तातडीने आला का? सभेबाबत काय आहे, सभा दोन-तीन दिवसांमध्ये लावायचे वगैरे असे काय आहे?

**प्र. सचिव :-**

सभा चोवीस तासाच्या आत लावू शकतो. कलमामध्ये तसे नमुद आहे.

(प्र. सचिवांनी कलमामधील प्रकरण २(क) चे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

यामध्ये जे कोर्टाचे निर्देश आलेले आहेत. त्याबाबतची माहिती उपायुक्त साहेबांनी द्यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीच्या निविदेची प्रक्रिया सुरु केली होती. त्या निविदांच्या प्रक्रिया संबंधी मा. स्थायी समितीच्या सभापतींनी आता जे निर्देश दिले की, उच्च न्यायालयाच्या निर्देशाची माहिती द्यावी. या संदर्भामध्ये उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्र. ३७५८/०५ या रिट पिटीशनने सहकार एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड हे त्याचे पिटीशनर्स आहेत आणि मिरा भाईंदर महानगरपालिका त्याचे रिस्पॉन्डेड आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, हे कोणत्या कारणाने कोर्टात गेले होते? कोर्टात रिट पिटीशन दाखल केले. जे आपण नियम बनवले त्यामुळे कोर्टात गेले की, कशामुळे कोर्टात गेले?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

स्थायी समितीने जकातीच्या अटीशर्ती अतिरिक्त अटीशर्तींचा उल्लेख केला होता. त्या संदर्भात संबंधित पिटीशनर कोर्टामध्ये गेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ज्या अटीशर्ती बनवल्या होत्या त्या फेटाळण्यांत आल्या होत्या का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

माझी आपल्याला अशी विनंती आहे की, मी माहिती दिल्यानंतर आपण जर प्रश्न विचारले तर मला व्यवस्थित उत्तर देता येईल.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेबांना याबाबत संपुर्ण माहिती देऊ द्या. त्यानंतर आपण आपले प्रश्न विचारा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या संदर्भामध्ये मा. स्थायी समितीने ज्या अतिरिक्त अटीशर्तीचा उल्लेख केला होता. त्या स्थायी समितीच्या रिझॉल्युशननुसार / ठरावानुसार अटीशर्तीचा उल्लेख करुन ज्या निविदा मागविण्यांत आल्या होत्या त्या विरोधामध्ये संबंधित पिटीशनरने हायकोर्टामध्ये केस दाखल केली होती. हायकोर्टामध्ये केस दाखल झाल्यानंतर या सर्व बाबींची पडताळणी मेहेरबान हायकोर्टासमोर झाली. त्याच्यामध्ये सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली. नगरपालिकेच्या वकीलाने ह्याबाबतची माहिती कोर्टासमोर सबमिट केली आणि अशी माहिती सबमिट केल्यानंतर दि. १३ जुन २००५ रोजी ही केस कोर्टासमोर आली व त्यामध्ये अंतिम आदेश मेहेरबान उच्च न्यायालयाने असे दिले आहेत, ते मी आपल्याला वाचून दाखवतो आणि आपल्याला जर अजून माहिती हवी असेल तर ती माहिती देता येईल.

(मा. उपायुक्त (मुख्यालय) श्री. अशोककुमार रणखांब सो. ह्यांनी सभागृहात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे वाचन केले.)

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मेहेरबान कोर्टाने हे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य महानगरपालिकेला दिलेले आहे. ह्याबद्दलची अधिक माहिती हवी असल्यास येथे आपले विधी सल्लागारही आहेत.

**रिटा शाह :-**

आपण गोषवारा दिलेला आहे. पण एकुण किती टेंडर फॉर्म आपल्याकडे जमा झाले होते? फक्त तीनच निविदा कोर्टासमोर सादर झालेल्या आहेत. मग बाकीच्या निविदांचे काय झाले?

**गजानन भोईर :-**

बाकीच्या तीन निविदा न उघडण्याचे कारण काय?

**सुर्यकांत भोईर :-**

एकूण तेरा निविदा आल्या होत्या.

**रिटा शाह :-**

सहा निविदा सबमिट झाल्या होत्या. तर सहामधून तीन निविदा उघडल्या व राहिलेल्या तीन निविदा का उघडल्या नाहीत?

**सुर्यकांत भोईर :-**

त्या तीन निविदा का उघडल्या नाहीत?

**गजानन भोईर :-**

त्या तीन निविदा का उघडल्या नाहीत, ह्याचा खुलासा करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

निविदा उघडल्या असतील तर काय आहे ते आम्हांला दाखवा.

**रिटा शाह :-**

त्यात ६० च्या वरही असू शकते.  का, कोर्टाने आदेश दिले तीन निवदा उघडा व तीन निविदा बंद ठेवा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या अटीशर्तीची पुर्तता न केल्यामुळे त्या निविदा उघडल्या नाहीत.  असे असेल तर आम्हांला सांगा.

**रिटा शाह :-**

पण निविदा उघडल्यानंतरच तुम्हांला समजेल ना?

**गजानन भोईर :-**

अटीशर्तींची पुर्तता केली नाही हे कसे समजेल?  त्या निविदा बंद आहेत ना?

**रिटा शाह :-**

निविदा उघडल्यानंतरच तुम्हांला समजेल ना, अटीशर्तींचे पालन केले की, नाही?  आपण असे कसे उत्तर देता.  काहीही उत्तर देणार हे चालणार नाही.  तुम्ही टेंडर उघडलेच नाही तर तुम्हांला कसे माहित पडले की, त्यांनी पालन केले की नाही?

**सुर्यकांत भोईर :-**

सहाच्या सहा निविदा उघडायला पाहिजे होत्या.  त्यातल्या तीन निविदा कशा उघडल्या गेल्या?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

कुठलेही टेंडर हे दोन लिफाफ्यामध्ये असते हे आपल्यालाही माहिती आहे आणि पहिल्या लिफाफ्यामध्ये एलिजेबल कंडिशन तो पुर्ण करतो की, नाही.  यामुळे सहा निविदाधारकांचा पहिला लिफाफा उघडण्यांत आलेला आहे आणि ज्या निविदाधारकांनी अटीशर्तींची पुर्तता केलेली आहे त्यांची तीन निविदा उघडण्यांत आलेली आहे.  आपण जे आता सांगता की, त्या तीन निविदा का उघडल्या नाहीत, तर असे नाही.

**रिटा शाह :-**

आपण हे गोषवाऱ्यामध्ये क्लिअर दिलेले नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तीन निविदाधाकांची निविदा उघडण्यांत आलेल्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

ज्या निविदा उघडल्या नाहीत, तेही आपण आमच्यासमोर दाखवा.

**श्री. साळवे (विधी सल्लागार) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, ह्या प्रकरणामध्ये आपण एकूण तेरा फॉर्म विकले होते व त्यापैकी सहा फॉर्म भरुन परत आले आणि आपण फॉर्ममध्ये दिलेल्या शर्तीप्रमाणे दोन लिफाफ्यामध्ये टेंडर मागितले होते.  पहिल्या लिफाफ्यामध्ये अटीशर्ती पुर्ण करणारे कागदपत्र आणि दुसऱ्या लिफाफ्यामध्ये त्याने आपल्या येथे डिपॉझिट भरलेली रिसीप्ट.  अशा प्रकारे दोन लिफाफ्यामध्ये टेंडर मागवले होते.  पहिला लिफाफा एलिजिबिलीटी आहे का नाही हे ठरविण्यासाठी आलेले सहा लिफाफे उघडले.  त्या सहा लिफाफ्यामध्ये तीनच ठेकेदार एलिजिबल आहेत असे त्यावरुन दिसून आहे. म्हणून तीनच निविदाधारकांच्या निविदा उघडण्यांत आल्या व हायकोर्टाचे रिट पिटीशन झाल्यानंतर हायकोर्टात ६ तारखेला पिटीशन दाखल झाली.  ८ तारखेला हेअरिंगला आली व ८ तारखेला कोणत्याही प्रकारची कोर्टाची ऑर्डर झाली नाही.  १०ला ते पोस्टपोन झाले.  १० तारखेला कोर्टाने कोणत्याही प्रकारची ऑर्डर न देता, महानगरपालिकेला असे आदेश दिले की, आपण ज्या अटीशर्ती ठरविलेल्या आहेत, त्याप्रमाणे प्रोसिड व्हा.  म्हणून १३ तारखेला ते सहा लिफाफे उघडले.  त्यामध्ये तीन निविदाधारक एलिजिबल ठरले आणि त्यांनी त्यांच्या दिलेल्या रक्कमा अपर केलेले बिट आपण ते सहा अर्जदारांच्या रिपोर्टसह ठेवल्यामुळे कोर्टाने मान्य केले की, आपण ज्या शर्ती ठेवलेल्या आहेत त्याप्रमाणे आपण पुढे प्रोसिड व्हा.  म्हणून त्यामध्ये पुढील ऑर्डरसाठी कोर्टाने २० तारीख ठेवलेली आहे.  परंतु, आपण जे कायदेशीरपणे केलेले आहे ते कायदेशीर आहे व त्याप्रमाणे आपण प्रोसिड व्हा असे मा. हायकोर्टाचे मत आहे आणि आपल्याला हायकोर्टाने तसे डायरेक्शन दिलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

साहेब, पहिल्याच्या अटीशर्ती होत्या त्या की, आत्ताच्या अटीशर्ती ॲड केल्या त्या?  कुठल्या अटीशर्तींचे कोर्टाने सांगितले आहे?

**श्री. साळवे (विधी सल्लागार) :-**

आपण ज्या अटीशर्ती ॲड केलेल्या आहेत त्या बरोबर आहेत असे आजच्या घडीला कोर्टाचे मत आहे आणि त्याप्रमाणे आपण प्रोसिड व्हा असे कोर्टाने सांगितले आहे.

**मा. सभापती :-**

एलिजिबल ज्या अटीशर्ती ह्याचे कोर्टाने आपल्याला निर्देश दिलेले आहेत, ज्या तुमच्या अटीशर्ती आहेत त्या एलिजिबल आहेत आणि त्याचे लिफाफे उघडायचे एलिजिबल कोणी ठरवले, तर आपण ठरवले नाही. आपण ज्या अटीशर्ती दिल्या होत्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विरोधामध्ये सहकार एजन्सी जेव्हा हायकोर्टात गेली, ते याकरिता गेली की, ज्या अटीशर्तींना सभागृहाने मान्यता दिली होती त्या अटीशर्तींबाबत त्यांना साशंकता होती व ते हायकोर्टामध्ये गेल्यावर हायकोर्टाने ज्या पद्धतीने आपण अटीशर्ती दिल्या, त्या अटीशर्तींवर ती एजन्सीमध्ये गेली होती. म्हणून त्या अटीशर्तींच्या प्रोसेसमध्ये टेंडर फॉर्म मागवले होते. ज्या अटीशर्ती आपण केल्या त्या एलिजिबल आहेत असे आपल्याला कोर्टाने सांगितले व जे एलिजिबल लिफाफे होते ते लिफाफे आपण कोर्टाच्या निर्देशाने ओपन केले आणि जे लिफाफे एलिजिबल नाही ते कोर्टाकडे आहेत.

**गजानन भोईर :-**

म्हणजे त्या तीन निविदा कोर्टाकडे आहेत. त्या निविदा केव्हा ओपन होणार आहेत?

**मा. सभापती :-**

कोर्टाच्या आदेशाप्रमाणे ओपन होतील.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण एवढ्या लवकर सभा का घेतली? कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर आपण सभा घ्यायला पाहिजे होती.

**गजानन भोईर :-**

एखादे टेंडर कोर्टामध्ये असेल तर त्यावर आपल्याला निर्णय घेता येतो का? आपण नेहमी मा. महासभेत बोलतो, कोर्ट केस आहे, ह्यावर बोलता येणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ही सभा कशी काय लावली?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, मा. उच्च न्यायालयाचा जो पेपर आपल्याला दिलेला आहे, त्यात तीन नंबर जे आहे त्यात स्पष्टपणे लिहिले आहे की, दि कॉर्पोरेशन इज दॅट लिबर्टी टू प्रोसेस दि एलिजीबल बीटस् ॲण्ड प्रोसिड टू अवर कॉन्ट्रॅक्ट इन अकॉर्डन्स विथ दि लॉ. अधिनियमातील तरतुदीनुसार जे एलिजीबल आहेत त्याप्रमाणे आपण कार्यवाही करा असे मा. उच्च न्यायालयाने आपल्याला स्पष्टपणे आदेश दिलेले आहेत.

**रिटा शाह :-**

स्पष्ट आदेश दिलेला आहे. पण मा. उच्च न्यायालयाचा फरदर आदेश नाही की, ज्या तीन निविदा पेन्डींग राहिलेल्या आहेत त्या कोर्टाकडे ठेवलेल्या आहेत. त्याबाबत तुम्हांला काहीही आदेश दिलेला नाही. उद्या त्याच्यामध्ये एखादे टेंडर ६० करोडच्या वर असेल तर त्यावर आपण कसा काय निर्णय घेणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

मग हे टेंडर कॅन्सल करणार का?

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर मी अनऑफिशिअली बोलतो. जेव्हा हे टेंडर फॉर्म ओपन झाले तेव्हा तिथे जे ठेकेदार होते त्यांना माहिती असेल की, एकानेही ४५ करोडच्या वर निविदा भरली नव्हती आणि ६० करोडची निविदा आहे असे समजल्यावर जे राहिलेले निविदाधारक होते ते निघून गेले. कारण त्यांना माहिती असेल की, ६० करोडपर्यंत आपण निविदा भरली नाही व त्यांनी कोणतीही पुर्तता केली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कोर्टाने २० तारीख दिलेली आहे ना?

**सुर्यकांत भोईर :-**

२० तारखेनंतर सभा लावायला पाहिजे होती.

**मा. सभापती :-**

२० तारखेला त्यांनी जी एम.डी. भरली, बँक गॅरेंटी भरली व २० तारखेला आपण ते कोर्टात सबमिट केले तर क्लिअरकट होईल असे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आपल्या ज्या अटीशर्ती आहेत त्या जशाच्या तशा कोर्टाने दिलेल्या आहेत. तर त्या अटीशर्ती आपला असा पॉईंट होता की, दोन करोडची गॅरेंटी त्यांनी द्यायची असे ठरले होते. तर त्यांनी दोन-दोन करोडची गॅरेंटी दिली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

ज्यांची निविदा ओपन करण्यांत आली त्यांनी आपल्याला हे दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

साठ कोटी रुपये जे आलेले आहेत तर ही संधी आपल्याला मिळालेली आहे. त्या साठ कोटीच्या हिशोबाने जर कोर्टात उद्या काही मागेपुढे झाले तर जी मिळालेली संधी साठ कोटीची आहे ती जाता कामा नये.

**रिटा शाह :-**

साठ कोटी रुपये मिळावे ही आमचीदेखील इच्छा आहे.

**गजानन भोईर :-**

साठ कोटी ऐवजी जर ऐंशी कोटी रुपये जेवढे जास्त मिळतील तेवढे चांगले आहे. पण ते कायद्याने आले पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

चेअरमन साहेब, ही चांगली गोष्ट आहे. आज त्या ठेकेदाराने डबल रक्कम वाढवून दिली आहे व साठ करोडच्या पुढे कोणी निविदा भरलेली नसेल ह्याचीही आपल्याला खात्री आहे. तर आपण ह्याला मंजुरी देणे हे योग्य आहे.

**रिटा शाह :-**

आपण मंजुर करु या.

**मिलन पाटील :-**

जो निर्णय आहे, तो कोर्टावर सोडू या.

**रिटा शाह :-**

ज्या तीन निविदा पेन्डींग आहेत आणि त्या उघडल्या............

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, जर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्तोत्रामध्ये एवढी जर वाढ होत असेल आणि हायकोर्टाचे तसे निर्देश आपल्याला असतील, तर आपल्या शहराच्या विकासाच्या दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे की, त्याने इतक्या टक्क्याने जकात वाढवली आहे आणि राहिला प्रश्न कोर्टाचा, तर कोर्टानेच आपल्याल निर्देश दिले आहेत. कारण स्थानिक स्वराज्य संस्था ही आपल्या विकासाच्या बाबतीत स्थानिक स्तरावर निर्णय घेऊ शकते आणि असे जर असेल तर मला देखील असेच वाटते की, आपण ह्या निविदा स्विकारायला काही हरकत नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आमचा ह्या निविदेला विरोध नाही. पण त्या तीन निविदा उघडल्या व त्यात जर पुर्तता केलेली असेल.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला माहिती दिलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, २२ तारखेला संबंधित ठेकेदाराचा देकार पुर्ण होत आहे. २२ तारखेपासून पुर्ण चार दिवस त्याला ए.एम.डी.साठी नियमाप्रमाणे अवधी दिला पाहिजे. त्यानुसार उद्या फायनान्शिअल प्रश्न येईल. जसे संबंधित सभापती जबाबदार तसे सर्व जबाबदार. कारण हा विषय आर्थिक स्वरुपाचा, निकडीचा आहे. त्याला पुर्ण चार दिवस देण्यासाठी आपल्याला प्रॉपर तेवढा कालावधी मिळावा म्हणून ही सभा तातडीने घेण्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी तसे निर्देश सभापती साहेबांना दिले होते. राहिला प्रश्न कोर्टाचा, तर मा. उच्चा न्यायालयाने आपल्याला स्पष्टपणे आदेश दिलेले आहेत आणि आपला जो विषय आहे तशा स्वरुपाचे प्रश्न जर निर्माण झाले तर सन्मा. आयुक्त साहेब आणि मा. उच्च न्यायालय या बाबतीमध्ये काय निर्णय घ्यायचा आहे ते बघतील.

**मा. सभापती :-**

आयुक्ता साहेबांनी पत्र दिल्यानंतर मी त्या पत्राचा विचार केला की, चोवीस तासामध्ये सभा बोलावली पाहिजे असे त्यांचे पत्र आहे. त्या पत्रावर नियमाचा उल्लेख केल्यानंतर तसे करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. जर आपण इन बिटवीन त्या कालावधीमध्ये जर हे टेंडर ओपन करुन त्याला मंजुरी नाही दिली व चार दिवसामध्ये पुर्तता झाली नाही तर पुन्हा मुदतवाढीचा प्रश्न निर्माण

होईल आणि जेव्हा मुदतवाढ येईल तेव्हा एका महिन्यामध्ये जी दोन करोड जी वाढ झालेली आहे, त्या दोन करोड वाढीमुळे आपण आर्थिक नुकसानीमध्ये जाऊ. आपल्या हातामध्ये ही संधी असतांना फायनान्शियली कुठल्याही बाबतीमध्ये आपल्यावर कोणाचे ताशेरे येता कामा नये व येऊ नये या दृष्टीकोनातून ही २४ तासात सभा बोलावली. कारण त्यांची मुदत पुर्ण होते व उद्या त्यांच्या मुदतवाढीचा प्रश्न ह्या चार दिवसामध्ये निर्माण झाला व त्या मुदतवाढीला आपण सामोरे गेलो तर होणाऱ्या वीस कोटीचा जो फायदा आहे व साठ कोटी रुपयांचे टेंडर आलेले आहे व मागचे टेंडर ३६ कोटी रुपयाचे आहे. तर ३६ कोटी रुपयाप्रमाणे त्याला आपण जास्तीत जास्त दहा टक्के वाढ देऊ शकतो आणि तसे केले तर आपल्याला नुकसान होईल आणि ह्या कोर्टामध्ये असलेल्या मॅटरमध्ये जर आपण फायनान्शिअली कुठे गेलो तर आपल्याला कोणत्या ना कोणत्या पार्टीचे असेल की, स्थायी समितीच्या ह्या धोरणामुळे आज मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नुकसान झाले. असे कुठे येऊ नये या दृष्टीकोनातून आपण आज हा विषय सभेसमोर आणला आहे. सन्मा. आयुक्त साहेब या ठिकाणी आलेले आहेत. मी त्यांचे सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने हार्दिक स्वागत करत आहे. मुदतवाढीला हा विषय जाऊ नये आणि मुदतवाढीला जर हा विषय गेला तर ह्या आर्थिक नुकसानीला आपणही तितकेच जबाबदार राहू अशा प्रकारचे वातावरण निर्माण होईल व त्याच्यावर कोणी ऑब्जेक्शन घेतले तर, म्हणून सर्व स्थायी समितीच्या सदस्यांच्या दृष्टीकोनातून, शहराच्या विकासकामाच्या दृष्टीकोनातून मागे पडल्यासारखे आपल्याही मनाला वाटेल, असे मला वाटते. सदर सभेस आयुक्त साहेब आलेले आहेत, याबाबत जर आपल्या काही सुचना, शंका आहेत त्या कृपया सदस्यांनी मांडाव्या अशी विनंती करतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, ही कार्यवाही करतांना न उघडलेले टेंडर आणि उघडलेले टेंडरसहित आपण ही कार्यवाही करु शकतो का? कारण त्याच्यामध्ये किती रक्कम आहे, काय आहे हे आपणांला माहिती नाही. तरीही आपण कार्यवाही करु शकतो का?

**मा. आयुक्त :-**

हा जो विषय आहे तो मा. उच्च न्यायालयासमोर पुर्ण चर्चा होऊन उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे. त्यावरुन ह्या विषयावर अजुन काही चर्चा करावी आणि कोर्टाच्या आदेशाच्या व्यतिरिक्त काही करावे अशी परिस्थिती नाही. तसेच हे जे तीन आपण ठरवलेल्या कंडीशनप्रमाणे पात्र लोक आहेत, त्यामधून जो हायेस्ट कोणार्क निविदाधारक आहे त्याला सिलेक्ट करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. सेकन्ड निविदाधार जर अग्रवाल अन्यथा कोणी अजून वादी असतील, त्या हायकोर्टाच्या केसमधले तर कदाचित त्यांनी तिथे तसा स्टँड घेतला असता की, माझी जी ऑफर आहे ती कोणार्क एजन्सीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे मला संधी मिळणे आवश्यक आहे. ह्या ज्या कंडीशन आहेत, त्या मागे घेऊन लोकहितास्तव सर्वात जास्त बोली मी बोललेलो आहे आणि त्यामुळे मला संधी मिळाली असा स्टँड मागच्या सुनावणीच्या वेळेला त्यांना घेता आला असता. परंतु, तसा स्टँड त्यांनी ज्याअर्थी घेतलेला नाही त्याअर्थी त्याची जी ऑफर आहे ती साठ कोटीपेक्षा नक्कीच कमी असण्याची शक्यता आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन हायकोर्टाने जो आदेश दिला आहे तो कॉर्पोरेशन इज दॅट लिबर्टी टू प्रोसीड टू दि एलिजिबल बिल्टस् ॲण्ड प्रोसीड टू अव्हॉइड दि कॉन्ट्रॅक्ट इन अकॉर्डन्स विथ लॉ. ह्याच्यामध्ये एलिजीबल बिल्डर्सला आपल्याला कॉन्ट्रॅक्ट द्यायचे आहे. आपल्या कंडीशनप्रमाणे एलिजीबल बिल्डर आज कोण आहे? तर कोणार्क एजन्सी आहे. कोर्टासमोर विषय असा गेला होता की, हे जे सहा टेंडर आलेले आहेत त्याच्यामधून आम्ही घातलेल्या अटीशर्तीनुसार आम्हांला पात्र तीन निविदाधारक वाटले. आपण निर्णय घेतला नव्हता. हे सर्व कोर्टावर सोपवले होते. कोर्टाला जर असे वाटले असते की, सहाच्या सहा एन्व्हलप उघडणे गरजेचे आहे तर कोर्टाने क्लिअरकट तसा आदेश दिला असता आणि जसे मी आपणाला सांगितले की, सहा निविदा उघडूनदेखील साठ कोटी रुपयापेक्षा जास्त रक्कम जाण्याची शक्यता ह्याच्याकरिता नाही की, तसे जर असते तर त्यांनीच कोर्टासमोर सांगितले असते की, माझी ऑफर साठ कोटींपेक्षा जास्त आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. पण आपण आता ठराव करतांना कदाचित जर जास्त रक्कम असेल तर काय?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी, मा. आयुक्त साहेबांनी स्पष्ट खुलासा केला की, जर तशी परिस्थिती उद्‌भवली असती तर ती व्यक्ती कोर्टापर्यंत गेली व ज्या वेळेला कोर्टासमोर सुनावणी झाली, त्यावेळेला स्वतःचा स्टॅण्ड असा ठेवला असता की, मी जर साठ कोटीपेक्षा जास्त रक्कम भरलेली आहे तर मला हा देकार का मिळू नये?

**रिटा शाह :-**

साहेब, मी अनऑफिशिअली बोलते की, एखाद्या वेळेस अग्रवालने साठ कोटीच्या वर निविदा भरली तरी त्याला टेंडर द्यायचे नाही असे मलाच नव्हे तर सर्व सन्मा. सदस्यांची इच्छा असेल. मागच्या वेळी आपण अग्रवालला ठेका दिला होता. त्यावेळी जनता भरपूर त्रासली होती व बहुतेक लोकांचा त्याच्याविरुद्ध पत्रव्यवहार आहे आणि ह्या ठेकेदाराने मागच्या वेळी टेंडर घेतले आणि मागच्या वर्षी ऑक्ट्रॉयबाबत जास्त तक्रार आपल्याकडे नाही आणि अग्रवाल ठेकेदाराल ठेका द्यायलाच नाही पाहिजे असे माझे मत आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण कुठल्याही नावाचा विचार करत नाही. प्रश्न फक्त इतकाच आहे की, अग्रवाल ठेकेदार कोर्टात गेले होते आणि कोर्टामध्ये ठेका मिळविण्यासाठी गेले होते ही गोष्ट खरी असेल व त्यांची ऑफर जर साठ कोटीपेक्षा जास्त असेल तर त्यांनी नक्कीच कोर्टाला विनंती केली असती की, माझी ऑफर जास्त आहे. त्यामुळे आमचे एन्व्हलप उघडण्याकरिता महापालिकेला डायरेक्शन द्यावेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कायदा काय आहे? सगळ्यात जास्त आहे त्याला द्यायचे की.........

**मा. आयुक्त :-**

हा कायदा हायकोर्टात जाऊन आला आहे. हायकोर्टाच्या वर आणखीन काय कायदा असतो?

**जोजफ घोन्सालवीस :-**

हायकोर्टाने आपल्याला काय निर्देश दिले आहेत, जे तुमच्या अधिनियमात बसेल त्याप्रमाणे करा.

**मा. सभापती :-**

ज्या अटीशर्ती आपण दिल्या त्या इलिजिबल आहेत. त्या अटीशर्तीप्रमाणे काम करावे असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले. ह्या अटीशर्तींच्या विरोधामध्ये जाणारा माणूस ज्याने आपल्याला कोर्टात नेले त्या पक्षकाराने ज्या कोर्टाची केस दाखल केली, महानगरपालिकेच्या विरोधामध्ये की, ह्या अटीशर्ती एलिजीबल नाही. त्या अटीशर्ती एलिजीबल ठरवल्या कोणी, तर कोर्टाने ठरवल्या आणि कोर्टाने ठरवल्यानंतर आपल्याकडे टेंडर फॉर्म आले आणि टेंडर फॉर्म आल्यानंतर त्या पद्धतीने जे आपल्यासमोर एलिजीबलच्या फिगर आल्या त्यात एलिजीबलचा प्रश्न येत नाही. पण ज्या पक्षकाराने कोर्टामध्ये गेल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विरोधामध्ये पक्ष मांडला, त्या पक्षकाराने त्या कोर्टामध्ये सांगितले असते की, माझी निविदा साठ कोटीच्या वर आहे. कृपया आमचे एन्व्हलप महानगरपालिकेला उघडायला सांगा. कारण त्याला ही निविदा भरायची होती व त्याला ही निविदा स्वस्तामध्ये पाहिजे होती. सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी त्या ठेकेदाराचा उल्लेख केला, तो ह्याकरिता केला कारण मागच्या वेळेला ज्या अडीअडचणी पुर्ण वर्षभर मागच्याच्या मागच्या वर्षामध्ये सतावले त्याचा आपल्याला पुर्ण अनुभव आहे. परंतु, त्याचा येथे नामोल्लेख करु नये. कारण त्याचा येथे नाही आहे. शहरामध्ये विकासाचे काम करत असतांना आपल्याला ज्या अडचणी निर्माण होतात त्या अडचणी विसरुन चालत नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या भावना येथे व्यक्त केल्या. धन्यवाद देतो. परंतु, जर ती निविदा साठ कोटींच्या वर असतील, तर तुम्हांला मी मघाशी काही गोष्टी बोललो. त्या पद्धतीने त्यांनी आपल्या महानगरपालिकेमध्येच गोंधळ केला असता आणि त्या पक्षकाराने तो ठेका घेतला असता. ३६ कोटीचा ठेका आजच्या ह्या वर्षाला ६० कोटी रुपयांवर गेलेला आहे. रक्कमेच्या डबल प्रमाणात गेलेला आहे आणि आज हा ठेका एवढा आहे व ही संधी आपल्याला मिळाली आहे. त्यामुळे आपल्या शंका-कुशंका हा अभ्यास आता झाला पाहिजे. या दृष्टीकोनातून आपण चर्चेत सहभाग घेतला ह्यात तिळमात्र शंका नाही. जर आपण ह्या कालावधीत उशीर केला आणि मुदतवाढीला जर आपल्याला पुन्हा सामोरे जावे लागले तर ३६ कोटीच्या दहा टक्के वाढ देऊन त्यांना मुदतवाढ ही कम्पलसरी द्यावी लागेल आणि कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे जर आपण काम केले व त्याला हा देकार देण्याचा विचार जर आपण केला तर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दुप्पटीने फायदा होणार आहे. तसेच, उद्या जर आर्थिक बाबतीमध्ये आपल्याला कुठे फेस करायला लागले तर त्याचे दुर्दैवाचे खापर तुमच्यासह आपल्या सर्वांच्या माथी मारुन घ्यावे लागेल. म्हणून आपल्या ज्या काही सुचना असतील त्या सुचनांचा खुलासा प्रशासनामार्फत जरुर केला जाईल. ह्याबाबत आणखीन काही खुलासे असतील तर ते सभेसमोर मांडावेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, माझी एवढीच शंका होती. आज सुवर्ण संधी आपल्याला मिळाली आहे व कोर्टाने जर ती तीन टेंडर उघडली नाहीत व जर काही ह्याच्याशी विसंगत झाले, आपल्या ठरावाशी तर आपल्याला काही इजा पोहोचता कामा नये.

**मा. सभापती :-**

आपल्याला त्याची इजा पोहचणार नाही. उच्च न्यायालयच त्याला सांगेल की, अशा तऱ्हेचे निर्देश आम्ही दिले आहेत.

**रिटा शाह :-**

कोर्टाने तसे क्लिअरकट फ्रिडम महानगरपालिकेला दिलेले आहे की, तुम्हांला जे एलिजीबल वाटते त्यांना तुम्ही द्या?

**गजानन भोईर :-**

आमचा ह्या ठरावाला विरोध नाही. आमची जी शंका आहे ती आम्ही येथे विचारली आहे.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे, आपली जी शंका आहे, ती आपण विचारलीच पाहिजे.

**गजानन भोईर :-**

उद्या जर त्या तीन निविदेतून एकाचीही निविदा ६५ करोडची निघाली तर त्याता आपले काय स्टँण्ड राहिल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

समजा, उद्या जर तुमच्याकडे एखादा माणूस आला. त्याने ६० कोटी ४० लाख रुपये एवढी रक्कम भरली तर त्याला आपण टेंडर देऊ शकू का? ती निविदा दोन लिफाफ्यामध्ये मागितली होती. आपण पहिला लिफाफा उघडला. एलिजीबल होते व स्थायी समितीने ॲड केलेल्या अटी कोर्टाने मान्य केले व उद्या एखादा ६५ कोटी निविदेवाला असला व आपल्या अटीशर्तीत बसत नसेल तर कोर्ट त्याला मान्यता देईल? कोर्टाला सुरुवातीला प्रायमरी वाटले असते की, ह्याच्यामध्ये काही इंटेशन आहे किंवा हे चुकीचे आहे तर कोर्टाने सर्व निविदा उघडण्याचे निर्देश दिले असते. ही गोष्टदेखील खरी आहे की, ६० कोटीपेक्षा जास्त कोणीही निविदा भरलेली नाही. परंतु, प्रत्यक्षामध्ये कोर्ट तसा निर्देश देऊ शकत नाही. कारण आपण जो पहिला लिफाफा उघडला ज्यांनी अटीशर्तीची पुर्तता केलेली आहे त्यांचेच लिफाफे उघडण्यांत आले आणि मा. उच्च न्यायालयासमोर महानगरपालिकेचा वकील व विरोध पक्षाचा वकील ह्यांनी आपआपले मुद्दे मांडले व अंतिम निर्णय उच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे ह्या प्रकरणात कोणत्याही प्रकारणी माहिती दडवून ठेवायची किंवा चुकीची माहिती असे नाही.

**गजानन भोईर :-**

मा. उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय दिलेला आहे ना की, ह्या तीन निविदाधारकांनी अटीशर्ती पुर्ण केलेल्या नाहीत म्हणून ह्यांचे टेंडर उघडण्यांत येत नाही असे कोर्टाने नक्की केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

कोर्टाने असे म्हटले आहे की, जे एलिजीबल बिल्डर्सचे जे बिटस् आहेत त्याच्यातून जे एलिजीबल असेल त्यांना प्रोसेस करा आणि कॉन्ट्रॅक्ट त्याला अवॉर्ड करा. आम्ही आपल्या कंडीशनप्रमाणे जे एलिजीबल होते ते कोर्टासमोर ठेवलेले होते. त्याच्यात कोर्टाने असे म्हटले की, त्याच्या व्यतिरिक्त जे बाकीचे आहेत त्यांचीही निविदा उघडा व त्यानंतर एलिजीबीलिटी डिसाईड करा असे कुठेच म्हटले नाही.

**रिटा शाह :-**

महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, अग्रवालला आपण ज्या अटीशर्ती पारित करुन दिल्या त्या अटीशर्तींच्या विरोधात तो कोर्टात गेला होता. त्याने स्थायी समितीच्या निर्णयाला चॅलेंज केले होते आणि रेटबद्दल किंवा एलिजीबिलीटीकरिता तो कोर्टात गेलेला नाही. एलिजीबीलिटी त्याची केव्हा पुर्ण होणार जेव्हा आपण पहिला बंच उघडला त्याता तो आपल्या एजिलीबिलीटीमध्ये पास झाला नाही. म्हणून आपण ते कॅन्सल केले व तीन ॲडॉप्ट केले असे आहे ना? म्हणजे ते रद्द झाले ना?

**मा. आयुक्त :-**

आपण हे हायकोर्टावर सोपवले की, हे बंद लिफाफे आहेत आणि जो काय निर्णय द्यायचा आहे तो कोर्टाने द्यावा.

**रिटा शाह :-**

कोर्टासमोर सादर केले तर त्यात तिघांची एलिजीबिलीटी नव्हती व तिघांची एलिजीबिलीटी होती. पण अग्रवाल ठेकेदार हा स्थायी समितीचा अपमान करुन, आपण जे अटीशर्ती पारित केल्या त्याचा अपमान करुन तो कोर्टात गेला.

**मा. आयुक्त :-**

अपमान असे नाही, प्रत्येकाला कोर्टाता जाण्याचा अधिकार आहे.

**मा. सभापती :-**

आम्हांला हे बोलण्याचे स्वायत्त पुर्ण आहे.

**रिटा शाह :-**

अग्रवाल ठेकेदाराने मागच्याच्या मागच्या वर्षी जे मिरा भाईंदर क्षेत्रातील व्यापाऱ्यांना, कंपनीच्या लोकांना हैराण केले होते त्यामुळे बहुतेक स्मॉल स्केल इंडस्ट्रीज ट्रान्सफर होऊन गेल्या. तशा माणसाला मी अनऑफिशिअली जाऊन सांगते की, त्याने जरी साठ करोड रुपये दिले तरी त्याला ठेका द्यायलाच नाही पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, हे जे साठ करोड रुपये तो आपल्याला देणार आहे त्याच्यात कमतरता नाही यायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

समजा, तो जर तोट्यामध्ये गेला तर ही रक्कम मध्येच कमी होता कामा नये.

**मा. आयुक्त :-**

त्याचे डिपॉझिट हे आपल्याकडे आहे.

**मा. सभापती :-**

स्थायी समितीने ऐतिहासिक निर्णय घेतला आणि ही ऐतिहासिक घटना मिरा भाईंदरच्या शहरामध्ये राहिल आणि राज्यामध्ये ही जाईल.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, अशाच घटना घडत जावो.

**मिलन पाटील :-**

औषधांच्या बाबतीत जे मागच्या वेळेला केले होते तो विषय आताचा नाही ना?

**मा. सभापती :-**

ही चर्चा आपण पुढच्या वेळी करु.

**रिटा शाह :-**

मुंबई उच्च न्यायालयाने तीन निविदेबद्दल जो आदेश आदेश दिलेला आहे व त्यामध्ये एलिजिबिलीटी ज्या टेंडरची आहे त्याला ही निविदा देण्याबद्दलचा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्वानुमते अनुमोदन आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी तशा पद्धतीचा ठराव दिलेला आहे. परंतु, सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने सर्वप्रथम मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो. आपल्या सर्वांना ज्ञात असेल, जेव्हा ह्या स्थायी समितीचे तिसरे अंदाजपत्रक ज्यावेळेला आयुक्त साहेबांनी सादर केले. त्यावेळेला मी बोललो की, आयुक्त साहेबांनी हॅट्रीक साधली. कारण सरळ तीन अंदाजपत्रक त्यांनी स्थायी समितीसमोर सादर केलेले होते. आयुक्त साहेबांचे चाळीस कोटींचे अंदाज होते व त्याच्यावर आम्ही पाच कोटीची वाढ सुचविली होती. कारण आम्हांला पुर्ण खात्री होती की, ह्याच्यामध्ये नक्की स्पर्धा होणार व ही स्पर्घा एवढ्या लेव्हलपर्यंत जाईल ह्याची आम्हांला कल्पना नव्हती. कारण ऐंशी टक्क्यांनी वाढ झालेली आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने हा पैसा नागरिकांच्या हितासाठी कामी येणार आहे.

**गजानन भोईर :-**

अशीच वाढ होत राहो व असेच आयुक्त साहेब आम्हांला कायमचे मिळो!

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांनासुद्धा धन्यवाद. अटीशर्तींबाबत बऱ्याच वर्तमानपत्रामध्ये काही बातम्या आल्या की, आपण पर्टीक्युलर एका माणसाला कुठेतरी फेवर करतोय. मी पुर्ण विश्वासाने सांगू इच्छितो की, ज्या अटीशर्ती आपण बनवल्या, त्या अटीशर्ती बनवल्यामुळे एवढ्या प्रचंड प्रमाणामध्ये कुठेतरी ठेकेदारांमध्ये स्पर्धेची भावना निर्माण झाली. तर सन्मा. आयुक्त साहेब आपणांला धन्यवाद. सभापती साहेबांना धन्यवाद.

**गजानन भोईर :-**

ह्याच्यामध्ये आणखीन अटीशर्ती आम्ही ठेकेदारांबाबत सुचवणार आह्रोत.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, अजून एक चांगली गोष्ट आयुक्त साहेबांनी करुन दिलेली आहे. कारण आपण जे मोठे कर्ज घेतले होते त्याच्यावर साडेसात टक्के उपलब्ध करुन दिले त्यामुळे ही धन्यवादाला प्राप्त आहेत आणि वीस कोटीने वाढ तर आपली क्रेडीट केवढी वाढली आहे. आपल्याला सात टक्केने दर देणारे लोक असतील व आहेतही. तर आपण सात टक्केने प्रयत्न करा आणि एम.एम.आर.डी.ए. कडून

जी मोठमोठी कर्ज घेतले आहे ते रिफन्ड करुन सात टक्क्याने कर्ज घ्यावे अशी आपल्याला विनंती करतो आणि परमेश्वर तुम्हांला ह्या कामी यश देवो। आणि आमचे हे आयुक्त महानगरपालिका पुर्णत्वाला येईल तिथपर्यंत लाभो!

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब, आपण स्थायी समितीच्या सभेला न आल्यामुळे आपल्याला हे परिणाम जाणवत असतील. कारण मा. महासभेमध्येसुद्धा आपल्याला ही गोष्ट पाहायला मिळत नाही. जनरली आपण आपल्या दालनामध्ये असता तेव्हा ही गोष्ट बघायला मिळत नाही. पण आपण स्थायी समितीसमोर आल्यानंतर ज्या पद्धतीने सन्मा. सदस्यांनी............

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, आम्ही तुम्हांला विनंती करतो की, दोन महिन्यातून एकदा तरी आपण सभेला या.

**मा. सभापती :-**

प्रॅक्टीकली आपल्याला आज जो अनुभव आला त्याबद्दल धन्यवाद मी स्वतःला देतो. मला येथे धन्यवाद नको. मी स्वतः धन्यवाद देतो. कारण अशा पद्धतीचे जर चांगले वातावरण होत असेल तर त्या वातावरणामध्ये अतिशय चांगला कारभार होऊ शकतो. तसा महापालिकेचा कारभार चांगला आहे. पण अजून चांगल्या गतिने होऊ शकतो असा विश्वास मला निर्माण झाला. म्हणून मी सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने आपल्याला विनंती करतो की, आपण किमान एक सभा सोडून एक सभेला यावे. जेणेकरुन लोकांचे जे मतभेद आहेत ते दूर होऊन मनमेळ झाले. ते संपुष्टात येतील असे मला सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांच्या बोलण्यावरुन समजते.

**गजानन भोईर :-**

आमचे मतभेद कधी होते?

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सभापती साहेबांशी मी पुर्णपणे सहमत आहे. कमिशनर साहेब आपल्या केबिनमध्ये आल्यानंतर येणारे सदस्य, स्थायी समितीने असा विषय घेतला, त्यात अशी चर्चा झाली, ते लोक तुम्हांला अडचणीत आणतील, आम्ही तुम्हांला अडचणीत टाकू, कोर्टात जाऊ, असे विषय होतात ते आमच्या कानावर येते. पण अशी कोणतीही बेजबाबदार गोष्ट येथे घडत नाही. हे आपण येथे थोड्याशा वेळामध्ये अनुभवले असेल.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीच्या निर्णयाशी मी सहमत होतो.

**प्रभात पाटील :-**

तिथे येऊन जरी कोणी तुम्हांला कानाफुशी करत असेल तरी कृपया स्थायी समितीचे सदस्य आपणांला अडचणीत आणणार नाही. कारण ते शहराच्या विकासाशी बांधिल आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मागे जो बांधकामची निविदा झाली तेव्हा काही लोकांची तिथे दादागिरी होती की, फॉर्म द्यायला देणार नाही किंवा फॉर्म घ्यायला देणार नाही. तेव्हा आपण सहकार्य करुन पोलिस बोलावले आणि जे लोकशाही पद्धतीने आपण फॉर्मचे वाटप सुरु केले आणि त्यापोटी महानगरपालिकेला पंधरा लाखापर्यंतचा फायदा झालेला त्याबद्दलही तुमचे अभिनंदन करते आणि पुढेही लोकशाही पद्धतीने टेंडर फॉर्म वाटप व्हायला पाहिजे अशी मागणी करत आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य असे काल झालेले नव्हते, मागच्या वेळेला झाले. मी साहेबांकडे जाणार आहे. माझी तक्रार आहे. असे काहीकांचे फॉर्म घेतले.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ३८ च्या ठरावाचे वाचन करुन सभागृहात ठराव मांडला.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्वानुमते अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून सर्वांच्या सहमतीने मंजुर झालेला आहे. मी सर्व सन्मा. सदस्यांना धन्यवाद देतो की, आपण आपल्या विविध सुचनांद्वारे आपण जी विविध माहिती घेतली व जी माहिती मिळाली, मला वाटते आपल्या शिकण्याच्या अभ्यासामध्येही भर असेल असे वाटते. कारण न्यायप्रविष्ठ प्रकरण असेल तर काय असते हा विषय आपला प्रत्येक वेळी असतो. परंतु, कधी कधी आपणही विचार केला पाहिजे. कारण मागच्या वेळी मी सुद्धा बोलून गेलो होतो. आपण जर हा निर्णय घेण्यांस कुठे विलंब केला

असता तर मुदतवाढीकरिता हा विषय गेला असता व त्यात नुकसान झाले असते आणि ज्या अभिकर्त्याने आपल्याला कोर्टात खेचले व आपल्या एलिजिबिलीटीला चॅलेंज दिले व त्याबाबत कोर्टाने आपल्याला न्याय चांगला दिल्याबद्दल कोर्टाला, प्रशासनालाला धन्यवाद देतो आणि हसत-खेळत एक ऐतिहासिक विषय पारित केला आणि ऐतिहासिक शहर घोषित करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यापुर्वी प्रशासन आयुक्त सभेला उपस्थित राहिले. म्हणून मी त्यांचे आभार मानतो व आपल्यावर असाच अभिनंदनाचा वर्षाव होत राहो अशी शुभेच्छा व्यक्त करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, सदर विषयाचा ठराव मी मांडला. असे नसते, तुम्हांला आम्ही सहकार्य करतो तरीही आपल्याला विश्वास नाही का? ठरावावर आपण माझी सही न घेता सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांची सही घेतली. म्हणजे तुम्हांला आमच्यावर विश्वास नाही का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम आपल्यावर आमचा विश्वास आहे.

**प्रकरण क्र. ३८ :-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुली कामी (जकात अभिकर्ता) निविदा मंजुरीबाबत.

**ठराव क्र. ४१ :-**

मे. कोणार्क इंफ्रा प्रा. लि. यांचा सन २००४/०५ सालातील जकात वसुलीचा करार दि. २२/०६/२००५ रोजी संपुष्टात येणार आहे. सन २००५/०६ सालातील जकात वसुली अभिकर्त्याची नव्याने नेमणूक करणे करीता खालील प्रमाणे देकार रक्कम निर्धारीत करण्यांत आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सन २००४/०५ सालातील देकार रक्कम | - | | ३६,२७,००,०००/- |
| १०% वाढीची रक्कम (एकूण) | - | + | ३,६२,७०,०००/- |
| अर्थसंकल्पीय (२००५/०६) ठरलेली देकार रक्कम | - | | ४०,००,००,०००/- |
| ५% इसारा रक्कम | - | | २,००,००,०००/- |
| १६% सुरक्षा अनामत | - | | ६,४०,००,०००/- |

वरील प्रमाणे सन २००५/०६ सालातील जकात वसुली अभिकत्यांची नव्याने नेमणुक करणेकरिता दि. २९/०५/२००५ रोजी १) नवभारत टाईम्स २) दैनिक सामना ३) दि. इंडियन एक्सप्रेस ४) दैनिक सकाळ व दि. २८/०५/२००५ रोजी सुरज प्रकाश (स्थानिक) या वृत्तपत्रात जाहीराती देऊन जकात वसुली कामी निविदा मागवलेल्या होत्या त्यापैकी दि. १०/०६/२००५ पर्यंत खालील इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रपत्र रक्कम रु. १०,०००/- महानगरपालिका फंडात जमा करुन स्विकारले होते.

१) मे. पारस कन्स्ट्रक्शन
२) मे. साई शरण इंटरप्रायजेस
३) मे. सहकार एजन्सीज प्रा. लि.
४) मे. किंग्ज इंटरप्रायजेस
५) मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा. लि.
६) मे. मोनार्च इंफ्रा प्रा. लि.
७) मे. बी. सी. बियाणी
८) मे. बी. सी. बियाणी प्रोजेक्ट प्रा. लि.
९) मे. वी. आर. पनवेलकर
१०) मे. कोणार्क इंफ्रा प्रा.लि.
११) मे. ओम साईराम इंटरप्रायजेस
१२) मे. साईकृपा डेरी प्रा. लि.
१३) मे. इगल कंस्ट्रकशन

वरील पैकी एकुण ६ निविदाधारकांनी दि. १०/०६/२००५ सायं. ४.०० वाजेपर्यंत सिलबंद लखोट्यात निविदा सादर केल्या होत्या.

१) मे. कोणार्क इंफ्रा प्रा.लि.
२) मे. ओम साईराम इंटरप्रायजेस
३) मे. इगल कंस्ट्रकशन

४)	मे. सहकार एजन्सीज प्रा. लि.
५)	मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा. लि.
६)	मे. साई शरण इंटरप्रायजेस

दरम्यान मनपातर्फे अतिरीक्त अटीशर्तींचा समावेश केल्या प्रकरणी मे. सहकार एजन्सीज प्रा. लि. यांनी रिट पिटीशन नं. ३८२३/२००५, मे. पारस कंस्ट्रक्शन यांनी रिट पिटीशन न. ३८२३/२००५ व रिट पिटिशन नं. १३१४१/२००५ नुसार मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केलेल्या होत्या. त्यानुसार दि. ०९/०६/२००५ रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशानुसार दि. १०/०६/२००५ रोजी सायं. ५.०० वाजता निविदा उघडण्याची कार्यवाही सुरु करुन एकुण ३ निविदा उघडण्यात आल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| **निविदाधारकाचे नाव** | **निविदेत नमुद केलेले जकात रक्कम** |
| --- | --- |
| १) मे. कोणार्क इंफ्रा प्रा. लि. | ६०,३०,६०,१११/- |
| २) मे. ओम साईराम इंटरप्रायजेस | ४५,४५,४५,४५९/- |
| ३) मे. इगल कंस्टक्शन कंपनी जे/व्ही. एस. एम.सी. इंफ्रा लि जे/व्ही ओमजी फायनान्स प्रा. लि. | ४१,००,४०,०००/- |

एकुण ३ निविदा उघडण्यांत आलेल्या नाहीत त्यांची माहिती खालील प्रमाणे

१)	मे. सहकार एजन्सीज प्रा. लि.
२)	मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा. लि.
३)	साई शरण इंटरप्रायजेस

एकूण प्राप्त ६ निविदांपैकी उघडलेल्या व न उघडलेल्या निविदा मा. उच्च न्यायालयात दि. १३/०६/२००५ रोजी सादर केल्या असता मा. उच्च न्यायालयाने, मनपाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करावी अशा पद्धतीचे आदेश देण्यात आलेले होते.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उघडलेल्या निविदांपैकी मे. कोणार्क इंफ्रा. प्रा. लि. यांची निविदा सर्वात जास्त रकमेची रु. ६०,३०,६०,१११/- (रु. साठ कोटी तीस लाख साठ हजार एकशे अकरा मात्र) असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम ३५ अन्वये सन २००५/०६ या आर्थिक वर्षासाठी ज्यादा देकार रकमेची निविदा स्विकारुन, त्याच बरोबर योग्य त्या अटिशर्तींसह करारनामे करण्यास ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.**		**अनुमोदन :- श्री. मिलन गोविंदराव पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.१५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**